# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८.

## क प्रभाग समिती सन २०१०-११ करिता अध्यक्ष पदाचे निवडणुकीसाठी विशेष सभा

**दिनांक :- ०३/०४/२०१०** **वेळ :- दु. १.००**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समिती सन २०१०-२०११ करिता सभापती पदाचे निवडणुकीसाठी विशेष सभा शनिवार दि. ०३/०४/२०१० रोजी दु. १.०० वाजता महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमधील सभागृहामध्ये मा. विभागीय आयुक्त, विधानभवन, पुणे यांचेकडील आदेश क्र नपा/कावि-८९/२०१० दि. २६/०३/२०१० नुसार त्यांचे प्रतिनिधी मा. श्री एम.एस. देवणीकर, पिठासिन प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. प्रस्तुत सभातील उपस्थित सन्मा. नगरसदस्य/नगरसदस्या यांची सोबत यादी जोडली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २९ अ [४] अन्वये सन २०१०-११ करिता मा. क प्रभाग समिती अध्यक्ष पदासाठी दि. २५/०३/२०१० ते ३०/०३/२०१० अखेरपर्यंत अर्ज वाटप करण्यात आले आहेत. दि. ०१/०४/२०१० रोजी अर्ज स्विकृतीच्या दिवशी मा. आल्हाट शांताताई महेंद्र व मा. लोंढे संतोष ज्ञानेश्वर यांचे **अध्यक्ष** पदासाठी एकुण २ अर्ज प्राप्त झाले आहेत. प्राप्त अर्जाची छाननी केली असता सदरचे अर्ज वैध असल्याचे दिसुन आले. उमेदवारी मागे घेण्यासाठी मा. पिठासिन प्राधिकारी यांनी १५ मि. कालावधी दिलेनंतर प्रस्तुत वेळेमध्ये मा. आल्हाट शांताताई महेंद्र यांनी लेखी नोटीस देऊन त्यांची अध्यक्ष पदाची उमेदवारी व नामनिर्देशन पत्र माघारी घेतले. त्यामुळे श्री. लोंढे संतोष ज्ञानेश्वर यांचा अध्यक्ष पदासाठी एकमेव अर्ज राहिल्याने त्यांची क प्रभाग समितीचे सन २०१०-११ करिता **अध्यक्षपदी** बिनविरोध निवड झाल्याचे मा. श्री. एम.एस. देवणीकर, पिठासिन प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका, यांनी घोषित केले.

सही/-
**[एम.एस.देवणीकर ]**
**पठासिन प्राधिकारी तथा**
**अतिरिक्त आयुक्त**
**पुणे महानगरपालिका, पुणे**

**प्रति,**

**सर्व संबधित**

**------------------------**

प्रत :- **१). मा. विभागीय आयुक्त सो. पुणे.**
यांचेकडे माहितीकरीता सविनय सादर.

**२). मा. आयुक्त सो, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
यांचेकडे माहितीकरीता सविनय सादर.

**३). मा. अति.आयुक्त सो. पुणे महानगरपालिका**
यांचेकडे माहितीकरीता सविनय सादर.

सही/-
**प्रशासन अधिकारी (सभाशाखा)**
**क प्रभाग समिती**
**भोसरी पुणे - २६.**

क्रमाक :- एएमसी/कप्र/२/कावि/५०/१०
दिनांक :-०३/०४/२०१०.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## 'क' प्रभाग कार्यालय

उपस्थित नगरसदस्य/नगरसदस्या यांची खालीलप्रमाणे नावांची यादी

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव | प्रभाग समिती सदस्याचे नांव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | १० | मोशी गावठाण | आल्हाट शांता महेंद्र |
| २ | १५ | चक्रपाणी वसाहत | सौ बढे सुलोचना बबन |
| ३ | २० | विठ्ठल रखुमाई मंदिर | फुगे सुनंदाताई विजय |
| ४ | २२ | लांडेवाडी | मोहिनी विलास लांडे |
| ५ | २३ | गुळवेवस्ती | लोंढे संतोष ज्ञानेश्वर |
| ६ | २७ | आण्णासाहेब मगर स्टेडीयम | भुंबे बाळासाहेब दिगंबर |
| ७ | ९९ | शंकरवाडी | मोटे एकनाथ नानासाहेब |
| ८ | १०१ | फुगेवाडी | गायकवाड सुरदास तुकाराम |
| ९ | १०२ | दापोडी गावठाण | काटे राजेंद्र भिकनशेठ |
| १० | १२ | च-होली गांव | खेडकर घनशाम रामचंद्र |
| | | | |